Celebrating Cinema
PIFF Pune International Film Festival

# ‘चित्रपट चालण्यासाठी चांगल्या कल्पनाही हव्यात’

## *मराठी चित्रपटांच्या परिसंवादातील मत*

पुणे, दि. १९ फेब्रुवारी २०२५ : मराठी चित्रपट चालण्यासाठी चांगल्या कथा असणारे चांगले चित्रपट तयार झाले पाहिजेत पण ते चालण्यासाठी प्रसिद्धीच्या आणि वितरणाच्या चांगल्या कल्पनाही पुढे आल्या पाहिजेत, असे मत चित्रपट निर्माते आणि दिग्दर्शकांनी व्यक्त केले.

२३ व्या पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवा(पिफ)मध्ये आज ‘मराठी चित्रपटासमोरील आव्हाने : निर्मिती आणि प्रेक्षक’, या विषयावर परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये अनेक प्रसिद्ध चित्रपटांचे निर्माते सुनील फडतरे, लेखक दिग्दर्शक परेश मोकाशी, अभिनेते दिग्दर्शक आदिनाथ कोठारे आणि दिग्दर्शक आदित्य सरपोतदार यांनी आपले मत व्यक्त केले.

परेश मोकाशी म्हणाले, “सर्व भाषांतील चित्रपटांसाठी प्रेक्षक येत नाहीत अशी सारखीच आव्हाने आहेत. यावर एकमेव उत्तर म्हणजे चांगला चित्रपट बनवला पाहिजे. तुमच्या दृष्टीने चांगला असलेला चित्रपट मात्र व्यावसायिकदृष्ट्या चालेल याची खात्री नाही. वाळवी आणि आत्मपॅम्फ्लेट हे चालले नाहीत, मग नाच ग घुमा हा चित्रपट करावा लागला. ते म्हणाले, काही समस्या असणारे चित्रपट हेच चांगले असतात, असा एक समज आहे, त्यावर खल झाला पाहिजे. असाच समाज आणि संस्कार लहानपणापासून झालेले असतात आणि त्याला समीक्षकही पुढे न्हेत असतात.

निर्माते सुनील फडतरे यांचा नुकताच संगीत मानापमान हा चित्रपट आला होता. ते म्हणाले, या चित्रपटाला खूप खर्च करूनही चित्रपटगृहात प्रतिसाद मिळाला नाही. लोक सोशल मीडियावर न पाहता चित्रपटाविषयी बोलत राहतात. त्यामुळे प्रेक्षकांवर त्याचा परिणाम होतो. गेल्या काही वर्षांमध्ये ओटीटी आल्यावर तर फार वाईट परिस्थिती झालेली आहे. ते म्हणाले, “दक्षिणेकडे प्रत्येक घटेल लोक दर आठवड्याला एक चित्रपट पाहतात. महाराष्ट्रात तसे होत नाही. पूर्वी एक पडदा चित्रपटगृह होते. तेंव्हा चित्रपटाचे दर कमी होते. आता मात्र मल्टीफ्लेक्सम्यूल दर वाढले आहेत, त्यामुळे त्यामुळे प्रेक्षक कमी झाले आहेत.”

आदिनाथ कोठारे म्हणाले, की मराठी चित्रपटाला जोखिम पत्करणारे लोक हवे आहेत. कॉर्पोरेट कंपन्या मराठी चित्रपट पुढे नेत नाहीत. कॉर्पोरेट कंपन्यांचे काही सूत्र आहेत. त्यात चित्रपट बसवावे लागतात. ही परिस्थिती बदलायची असेल, तर त्यासाठी त्या कंपन्यांमध्ये मोठ्या पदांवर मराठी असणे गरजेचे आहेत. दाक्षिणात्य चित्रपट पुढे जाण्यासाठी विविध वाहिन्यांनी हातभार लावला. त्यामुळे ते चित्रपट पुढे देशभरात गेले. यावेळी कोठारे यांनी ‘पाणी’ हा चित्रपट तयार करण्यापासून ते प्रदर्शित करण्यामध्ये कशा अडचणी आल्या याचा अनुभव सांगितला.

आदित्य सरपोतदार म्हणाले, की मराठी चित्रपटांचा व्यवसाय हा २०२४ सालामध्ये २०० कोटीपेक्षा खाली आहे. त्यातील केवळ ५ चित्रपट हे १० कोटींवर गेले.  मल्याळम चित्रपटांचा या वर्षात १३०० कोटींवर व्यवसाय झाला. मराठी चित्रपट मार्केटिंगमध्ये आणि प्रसिद्धी करण्यात कमी पडला. अजूनही पारंपरिक गोष्टी वापरून प्रसिद्धी केली जाते. मराठी चित्रपट इतर चित्रपटांच्या तुलनेत आर्थिकदृष्ट्या खालच्या स्तरावर आहे. मग वेगळ्या कल्पना काय आणू शकतो, यावर विचार केला पाहिजे. वितरण, प्रदर्शन यामध्ये वेगळ्या कल्पना आणल्या

पाहिजेत. उत्तम एजन्सी नाहीत.

सरपोतदार म्हणाले, की महोत्सवात चित्रपट आले, की चर्चा होते आणि त्या चित्रपटाला पुढे फायदा होतो. अनेक दिग्दर्शक या चित्रपटांमधून घडले आहेत.

परेश मोकाशी म्हणाले, आमची पिढी ही पिफ या महोत्सवानेच घडवली आहे. त्यातूनच आम्ही पुढे आलो आहोत.